# मालतीबाई दांडेकर

उज्वला केळकर

( मालतीबाई दांडेकर, ना. धों. ताम्हनकर, दा. न. शिखरे, बी. जी. नाईक यांच्या साहित्यकृतींच्या द्वारे.) मालतीबाई वयाच्या १७ व्या वर्षी, म्हणजे सुमारे १९२८ साली लग्न होऊन बुधगावला आल्या. त्यानंतर त्या जवळजवळ तीसेक वर्षे बुधगावला होत्या. त्यांचं बहुतेक सगळं लेखन बुधगावला झालं. बुधगाव तसं आडगाव. जुनाटच म्हणायला हवं. घरचं वातावरणही जुनंच. पण हे वातावरण आणि आडगाव, त्यांच्या प्रगतीत, व्यक्तिमत्व विकासात कुठेच आड आलं नाही.

मालतीबाईंना वाचनाची लहानपणापासूनच आवड. वाचनावर, चिंतन करायचीदेखील सवय पुढे पुढे जडली. लग्न झालं, तेव्हा त्यांचं शिक्षण इंग्रजी ४ थी पर्यंत झालं होतं. प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळता सांभाळता, पुढच्या काळात औपचारिक शिक्षण पूर्ण करणं त्यांना जमलं नाही. परंतु त्यांनी जिद्दीने, स्वप्रयत्नाच्या बळावर इंग्रजी पुस्तके वाचून, इंग्रजीवर भाषेवर प्रभुत्व मिळवलं. इंग्रजी ज्ञानभाषाचं. या भाषेच्या द्वारा जगभरचा ज्ञानाचा ठेवा हाती आला. लोकसाहित्य हा त्यांच्या आवडीचा, आस्थेचा विषय. मराठी लोकसाहित्याचं, लोकगीते, लोककथा, यांचा जिथून मिळेल, तिथून त्यांनी संग्रह केला. इंग्रजीमुळे जगभराच्या अन्य भाषेतील लोकसाहित्याची समज वाढत गेली.

एकीकडे वाचन, चिंतन, व्यासंग चालू होता. दुसरीकडे प्रपंच नेटका करणंही चालू होतं. मुलं मोठी होत होती. त्यांना दररोज नवी गोष्ट हवी असायची. त्यावेळी मनोरंजनाची दुसरी कुठलीही साधनं नव्हती. मुलांचा दररोज नव्या गोष्टीचा हट्ट मालतीबाई मोठ्या कौतुकाने पुरवत. मुलांच्या मित्र–मैत्रिणीही त्यांच्याबरोबर असतं. बुधगावचे पोस्टमास्तर श्री. आपटे यांच्या अंगणात संध्याकाळची गोष्टींची मैफल झडे, अशी आठवण त्यांची कन्या मीनाक्षी केतकर सांगते, तर या मैफलीतील उत्सुक श्रोत्या कमल सहस्त्रबुद्धे त्यावेळच्या कमल गोरे सांगतात, 'शाळा सुटली, की आम्ही तडक त्यांच्याकडे जायचो. त्या नवी लिहिलेली गोष्ट वाचून दाखवायच्या. आमच्या चेहऱ्यावरच्या प्रतिक्रिया न्याहाळायच्या. आम्हाला गोष्ट आवडलेली दिसली, की मगच ती प्रकाशित करण्यासाठी पोस्टात पडायची. अर्थात् या गोष्टी इतक्या सुंदर, अद्भूत असायच्या, की आम्हाला त्या खूप आवडायच्या.'

मालतीबाईंच्या आजीने त्यांना लहानपणी खूप लोककथा सांगितल्या होत्या. या कथा त्यांनी सुरुवातीला मुलांना, अगदी सोप्या भाषेत, रंजक, आकर्षक वाटतील, कुतूहल निर्माण होईल, अशा पद्धतीने सांगितल्या. याच पुढे 'माईच्या गोष्टी' म्हणून पुस्तक रूपात प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर लोकसाहित्याचा अभ्यास करून, लोककथांवर त्यांनी किती तरी पुस्तके लिहिली. 'शततारका' चे चार भाग, 'ताईंच्या गोष्टी' चे दहा भाग आणखीही खूप खूप कथा... अनेक देशातील लोककथांचे संशोधन करून त्यांनी 'देशोदेशीच्या लोककथा' ही पुस्तकमाला सिद्ध केली. मुलांना अद्भूत सृष्टीचे आकर्षण असते, हे लक्षात घेऊन त्यांनी, सहजसुंदर भाषेतील परिकथांचीही अनेक पुस्तके लिहिली. 'मोहनमाळ' 'परीचा बाग' याबरोबरच त्यांचे 'अतिपूर्वेच्या परिकथां' चे दहा भाग प्रसिद्ध झाले. यात चीन, जपान, व्हिएतनाम इ. देशातील परीकथांचे संकलन आहे.

बालवाङ्मयात मालतीबाईंच्या नावाची, लोककथा, परीकथांशी सांगड घातली गेलेली असली, तरी त्यांनी बालवाङ्मयाचे अन्य प्रकारही विपुलतेने हाताळले आहेत. 'टिन्नूची बहादुरी' या प्राणीकथांमधून मुले आणि प्राणी यांच्या मैत्रीचे चित्र रंगवले आहे. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक विषयांवरही त्यांनी कथा लिहिल्या आहेत. बालकादंबरी, बालनाटिका, बालगीते आणि संकीर्ण स्वरुपाचेही त्यांनी खूप लेखन केले आहे. 'दगडातून देव',

'अंधारातील देव' मधून त्यांनी उपेक्षितांच्या अंतरंगाला स्पर्श केला आहे. 'अंधारातील तारे' या मागास जमातीतील नव्या पिढीच्या मुलांच्या कथा आहेत, तर 'दगडातून देव' मध्ये मागास जातीतील माणूसही स्वप्रयत्ने भाग्योदय कसा करू शकतो, त्याचे कथानक आहे. या पुस्तकाला राज्य आणि केंद्र सरकार दोन्हीचाही पुरस्कार मिळालेला होता.

'सोनेरी नदीचा राजा', 'सोन्याची गिरणी' या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्याचा धागा परकीय असला, तरी त्यांची भाषा, वर्णन, विस्ताराचा परिवेश पूर्णपणे भारतीय आहे. किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेल्या 'गुलाबकळी', 'राया अथवा बालमूर्तिकार' या कादंबऱ्याही उत्कंठावर्धक असून, जिद्दीने आणि कर्तृत्वाने मनुष्य स्वत:चे जीवन घडवू शकतो, हा संस्कार करणाऱ्या आहेत. 'चंदेलीचे साहस', सारख्या मुलांना आवडणाऱ्या साहस या विषयावरच्याही कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'सुनीलकुमार आणि अनिरूध्द' मध्ये कुमारवयीन मुलांना सुंस्कार देऊन आदर्शवादाकडे नेणारे कथानक चित्रित केले आहे.

मालतीबाईंनी लिहिलेल्या संकीर्ण पुस्तकातही खूप विविधता आहे. 'जगातील जमाती', 'मीनाच्या मैत्रिणी', 'दुनियेतील मौज' यासारखी किती तरी पुस्तके, पृथ्वीवरील भिन्न लोक, त्यांची रहाणी, चालीरीती, यांची मजेदार माहिती देतात. 'उद्याची कन्या' व 'कन्येस सप्रेम भेट' ही पुस्तके आठ ते बारा वर्षांच्या मुलींशी हितगुज करणारी आहेत. कथा, पत्रे, संवाद इ. माध्यमांचा यात त्यांनी चतुराईने उपयोग करून घेतला आहे. कातरकाम, रांगोळ्या याही विषयांवरची त्यांची पुस्तके आहेत. मालतीबाईंच्या लेखन–विषयांचा परीघ किती विस्तृत होता, याची यावरून सहज कल्पना येऊ शकेल.

बालसाहित्याच्या क्षेत्रात मालतीबाईंची आणखी एक मोलाची कामगिरी म्हणजे, बालसाहित्याचे विवेचन करणारा, 'बालसाहित्याची रुपरेषा' हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ. बाल साहित्याच्या उगमापासून त्याच्या सर्व अंगांचे विस्तृत विवेचन करणारा हा ग्रंथ आहे. लोकसाहित्याच्या संकलनावर आधारित 'लोकसाहित्याची लेणी' हा ग्रंथही त्यांनी लिहिला. तसेच देशोदेशींच्या लोककथांच्या अभ्यासातून 'लोककथा कल्पलता' हा ग्रंथही त्यांनी सिद्ध केला आहे. १९७८ मध्ये संपन्न झालेल्या तिसऱ्या अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या.

*